ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# शिक्षक शिक्षण : दूरस्थ शिक्षण

**सौ. उंडाळे मृणाल स्वप्नील[1] व डॉ. रामचंद बाबुराव व्हनबट्टे[2]**

*[1]अध्यापकाचार्य,(एम.फील.विद्यार्थीनी) गेनबा सोपानराव मोझे अध्यापक महाविद्यालय.अंतर्गत डी.टी.एड् विभाग पुणे.*

*[2]असिस्टंट प्रोफेसर , आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन , सातारा.*

## Abstract

*भारतासारख्या विकसनशील,खंडप्राय देशात ,शिक्षण घेण्याच्या मार्गात अनेक अडथळे येतात. काहीच्या आर्थिक समस्या तर काहींना उदरनिर्वाहासाठी कामधंदा करणे भाग असते.काहींच्या गावी शिक्षण सुविधा नसतात.तर काहींना प्रापंचिक अडचणी असतात.विशेषत :मुली विवाहीत स्त्रिया यांच्या बाबतीत अधिक समस्या असतात .यांना शैक्षणिक गरजा भागविण्यासाठी शाळेपर्यत जाता येत नाही अशा लोंकासाठी दूरस्थ शिक्षण आवश्यक असते जे कमी खर्चात व सहज देता येते. शिक्षणाचा केंद्रबिंदू हा विद्यार्थी तर आत्मा शिक्षक आहे.एकूणच शिक्षण प्रकियेत शिक्षकाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.शिक्षणाची प्रकिया ही शिक्षकाच्या सकिय सहभागाशिवाय पूर्ण होउ शकत नाही.विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्य व जीवनाचा विकास साधण्याचे काम शिक्षकांमार्फत शिक्षणप्रकियेतून केले जाते.विनोबा भावेच्या मते शिक्षकाने विज्ञाननिष्ठा,विद्यार्थीनिष्ठा ,समाजनिष्ठा या जीवन अवलंब केला तर शिक्षणप्रकिया यशस्वी होईल त्याचबरोबर विद्यार्थ्याच्या वर्तनात इष्ट बदल घडवून आणण्याचे काम शिक्षकालाच करावयाचे असते.शिक्षक शिक्षणामध्येही विद्यार्थ्याला सक्षम बनवणे,त्याच्या सर्वांगीण व्यक्तिमत्वाचा विकास करणे,विविध कौशल्यांचा विकास करणे इ. बाबींचा विकास विद्यार्थ्यांमध्ये घडवून आणला जातो.त्यामुळे सद्यस्थितीत शिक्षक शिक्षण व दूरस्थ शिक्षणाची आवश्यकता आहे.*

***Scholarly Research Journal's* is licensed Based on a work at *www.srjis.com***

**प्रस्तावना :**

सर्वांसाठी समान शिक्षण देणा–या शासनाने आत्तापर्यंत अनेक शैक्षणिक आयोगाच्या साहाय्याने शिक्षणासंदर्भात नवनवीन तंत्रे राबवली. कारण शिक्षण हे समाज नियंत्रणाचे व समाज परिवर्तनाचे महत्त्वपूर्ण साधन आहे. आपला देश ,आपली संस्कृती नेहमीच संकटांशी संघर्ष करीत आली आहे.त्यामुळे आपला देश अनेक समस्यांशी झगडत आहे. दुष्काळ,द्रारिद्रय,अज्ञान व निरक्षरता,आतंकवाद इ.या समस्यांवर उपाय करायचा तर तो म्हणजे मानवी जीवनात अभाव असणा–या मूल्यांवर संस्कार केले तर मानवी जीवनात प्रामाणिकपणा,श्रमप्रतिष्ठा, श्रम करण्याची तयारी ,राष्ट्रीय व सामाजिक हिताची भावना विश्वास, वेळेचे महत्त्व, बंधुभाव अशा अनेक मूल्यांची निर्मिती होउ शकते.

समाजाला आदर्श बनावयाचे असेल तर ती सर्वस्वी जबाबदारी अध्यापक म्हणजेच शिक्षकांवर येऊन पडते.समाजातील अत्यंत महत्त्वपूर्ण घटक मानला जातो.कारण सर्व

आयोग व शैक्षणिक धोरणात लोकशाहीचा विकास, व्यक्तिमत्वाचा विकास, आधुनिकतेचा विकास, सामाजिक बांधिलकी इ.मूल्यांचा विकास करण्यास सांगितले आहे.

समाज विकसित करावयाचा असेल तर शिक्षणाची आवश्यकता आहे.आणि हे शिक्षण शिक्षक शिक्षणातून समाजापर्यंत जास्त पोहचेल.कारण शिक्षक हा समाजाशी बांधिलकी जास्त निर्माण करीत असतो.

**शिक्षक शिक्षण :**

व्याख्या : 1. शिक्षक शिक्षण म्हणजे अध्यापन व्यवसायात जाण्यासाठी तयार करणे.

2.विविध स्तरांवर म्हणजे पूर्व प्राथमिक,प्राथमिक ,माध्यमिक,उच्च माध्यमिक स्तरांवर परिणामकारक अध्यापन कार्य करणे. व सुयोग्य नागरिक घडविण्याचे कौशल्य ज्या शिक्षणाच्या माध्यमातून प्राप्त होते.त्याला शिक्षक शिक्षण म्हणतात.

3.शिक्षकाला व्यावसायिकदृष्टया सक्षम बनविणारे ,व्यावसायिक बांधिलकी जपणारे ,व विद्यार्थ्यासमोर

स्वत :ची आदर्श प्रतिमा ठेवण्यासाठी उपयोगी पडणारे शिक्षण म्हणजे शिक्षक शिक्षण होय .

**शिक्षक शिक्षणाची उद्‌दिश्टे :**

1.शिक्षणक्षेत्रातील अद्ययावत प्रगतीशी परिचय ठेवणे.
2.नवीन अध्यापन पदधती आत्मसात करणे.
3.शिक्षकांचा सर्वांगिण विकास करणे.
4.शैक्षणिक उद्‌दिष्टांची जाणीव करुन देऊन जाणीवांचा विकास करणे.
5.समाज व शाळा याच्यांतील संबंध दृढ करणे.
6.व्यावसायिक अस्मिता घडविणे.
7.आकलनशक्ती ,कौशल्ये ,अभिवृत्तीचा विकास करणे.

शिक्षक शिक्षणातील समस्या :

1.शिक्षक प्रशिक्षणात प्रवेश घेणा—यांची गुणवत्ता कमी असते.
2.ज्ञानाचा प्रसार ,विद्यार्थ्यातील जागृती,विद्यार्थ्यांवर पडणारा सामाजिक प्रभाव ,इ.मुळे निर्माण झालेल्या आव्हांनाना शिक्षकांना तोंड द्यावे लागते.
3.शिक्षक प्रशिक्षक महाविद्यालयात आवश्यक मानवी,भौतिक व शैक्षणिक सुविधांची कमतरता असणे.
4.जुना अभ्यासक्रम ,कालबाहय संदर्भ पुस्तके सुचविणे.
5.होतकरु शिक्षकाला बाधक अध्यापन पद्‌धतींचा वापर करणे.
6.प्रशिक्षणासाठी असलेल्या पाठयपुस्तकांमध्ये पाश्चिमात्य विचारांवर अवाजवी भर दिलेला असणे.

**शिक्षक शिक्षणातील सुधारणा :**

1. अभिवृत्ती व संपादन कसोटयांच्या आधारावर प्रवेश देणे.
2.खेळाडू व विविध अभिरुचीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देणे.
3.सेवापूर्व शिक्षक प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमाची पुर्नरचना करणे.
4.सेवापूर्व शिक्षक प्रशिक्षणात शिक्षण ,संस्कृती यांची एकात्मता ,कार्यानुभव ,शारिरीक शिक्षण ,भारतीय संस्कृती व एकात्मतेवर भर देणे.
5.सेवांतर्गत व निरंतर शिक्षणाची व्यवस्था करणे.
6.प्राथमिक शिक्षकांना सेवापूर्व व सेवांतर्गत शिक्षण देण्यासाठी निवडक संस्थाचे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत रुपांतर करणे.
7.राष्ट्रीय शिक्षण व प्रशिक्षण परिषदेला वैधानिक दर्जा देणे.

8.प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणामध्ये आमुलाग्र बदल करणे.
9.सेवांतर्गत प्रशिक्षणाची सोय करणे.
10.सर्वसमावेषक शिक्षणशास्त्र महाविद्यालये व जिल्हा प्रशिक्षण संस्थांना सुविधा पुरविणे.
11.सेवांतर्गत शिक्षणाचे अभ्यासक्रम तयार करण्यासाठी ,साहित्यांचा विकास करण्यासाठी व पद्धती ठरविण्यासाठी सेवाभावी संस्थांच्या अनुभवांचा फायदा घेणे.
12.राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,विद्यापीठ अनुदान मंडळ यांनी शैक्षणिक अनुभवानुसार काही पाठयपुस्तके ,संदर्भपुस्तक ,काव्यसंग्रह इ.नवीन अध्यापन साहित्य निर्माण करणे.

**शिक्षक शिक्षणाचे महत्त्व :**

शिक्षकी पेशामध्ये शिक्षकाला निरनिराळया भूमिकांमधून जावे लागते.शिक्षक हा केवळ ज्ञानग्रहण करणारा नसून विद्यार्थ्यांना अध्ययन प्रवृत्त करणारा व वेगवेगळे अध्ययन अनुभव देणारा असला पाहिजे.तसेच संस्कृतीचा वारसा संक्रमित करणे व विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे ,सामाजिक वास्तवतेचे भान ठेवणारा परिवर्तनाबाबत जागरुक असलेला ,राष्ट्राचे भवितव्य लक्षात घेउन मार्गदर्शन करणारा शिक्षक घडविण्याचे कार्य शिक्षक शिक्षणाच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून करावयाचे असते.म्हणून आज विद्यार्थ्यासाठी ,समाजासाठी ,राष्ट्रासाठी ,देशासाठी शिक्षक शिक्षणाचे खूप महत्त्व आहे.

शिक्षक शिक्षण घेत असताना विद्यार्थ्याला अध्यापन करण्याची क्षमता अध्यापन पदधतींची माहिती शैक्षणिक साधनांची ओळख विद्यार्थ्याविशयी माहिती शालेय व्यवस्थापनाशी जवळीक व्यवसायाबद्दलचा दृष्टीकोन ,शिक्षणातील नवीन प्रवाहांची ओळख, गुणवत्ता वाढीस सहभाग ,सामाजिक अंर्तमुखता ,व्यक्तिमत्वाचा विकास ,विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांची ओळख ,मूल्य रुजविण्याची भूमिका इ.गोष्टींची विद्यार्थ्याला माहिती होते.

सद्य परिस्थितीमध्ये विद्यार्थ्याचा शिक्षक शिक्षणाकडे पाहण्याचा जो दृष्टीकोन आहे त्याकडे पाहता शिक्षक शिक्षणात दूरस्थ शिक्षणाची आवश्यकता आहे.कारण हे शिक्षण फक्त शिक्षणाचाच प्रसार करत नाहीत तर सर्वांना शिक्षणाची समान संधी प्राप्त करुन देते.काही कारणास्तव ज्यांचे शिक्षण मध्ये थांबले असेल पण ज्यांना पुढे शिक्षण घेण्याची इच्छा आहे. अशांसाठी ,जे औपचारीक शिक्षण पद्धतीत शिक्षण घेउन पुढे जातात.त्यांच्या बरोबरीने व बरोबरीचे शिक्षण आपला धंदा किंवा व्यवसाय सांभाळून घेउ शकतात.तसेच मागासवर्गीय समाजातील लोक आपल्या गतीने व कुवतीप्रमाणे ,सोयीने शिक्षण घेउ शकतात.अशा प्रकारे शिक्षणाचा सहज प्रसार दूरस्थ शिक्षणाने होउ शकतो.

**दूरस्थ शिक्षणाची व्याख्या :**

1.जेव्हा विद्यार्थी व शिक्षक ही दोन केंद्रे एकमेंकांपासून अंतर व परीसराच्या दृष्टीने दूर असतात तेव्हा दूरस्थ उपयुक्त ठरते.
2.विद्यार्थी आणि शिक्षक या दोन घटकातील भौतिक अंतरामुळे छापील साहीत्य व आधुनिक तं़त्रज्ञान यांच्या माध्यमातून सुसंवाद साधून जे शिक्षण दिले जाते.त्याला दूरस्थ शिक्षण असे म्हणतात.

दूरस्थ शिक्षणाची उद्दिष्टे :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात 1986 च्या कृती कार्यक्रमाप्रमाणे दूरस्थ शिक्षणाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे
1.सर्वांना उच्च शिक्षणासाठी संधी निर्माण करणे हे असून सर्वांना खुली,कमी खर्चाची ,लवचिक व नावीन्यपूर्ण शिक्षणप्रणाली आहे.

2.व्यावसायीक क्षमता वाढवण्याकरिता मोठया प्रमाणावर व्यक्तींना एक पर्यायी शिक्षण प्रणाली उपलब्ध करुन देणे.
3.व्यक्तीला त्याच्या सोयींप्रमाणे शिक्षण उपलब्ध करुन देणे जेणे करुन ती फावल्या वेळेचा उपयोग शैक्षणिक हेतू करिता करु शकेल.
4.ज्ञानाच्या स्फोटामुळे निर्माण झालेल्या आव्हांनाना तोंड देण्यासाठी आजीवन आणि सतत शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे.
5.उपचारात्मक अध्यापनाचा प्रत्यय आणून देणे.
6.स्वंयअध्ययनाच्या सवयींचा विकास करणे,विविध कौशल्यांचा विकास करणे.
दूरस्थ शिक्षण पद्धतीमध्ये पत्राद्वारा,सतत शिक्षण ,मुक्तशाळा,विद्यापीठाद्वारा इ.प्रकार आढळतात. ही पद्धती यशस्वी होण्यासाठी काही बाबी आवश्यक मानल्या जातात त्यासाठी समाज व शिक्षक इ.नी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**1.संघटनात्मक :**

दूरस्थ शिक्षणाच्या कार्यक्रमाचे संघटन म्हणजे एक तारेवरची कसरत असते.मुक्त विद्यापीठ किंवा दूरस्थ शिक्षणाचे मुख्य केंद्र एकीकडे आणि शिक्षण घेणारा विद्यार्थी कितीतरी अंतरावर असतात.परंतु दोघामध्ये संपर्क हा विविध माध्यमातून व्यवस्थित ,तत्पर ,नेमके आणि प्रभावी संघटन होते.काही वेळेस मुख्य केंद्र आणि अध्ययन केंद्र ज्यामधून विद्यार्थी व केंद्रामध्ये सुसंवाद साधला जातो परंतु या सुसंवादात अनियमितता असते.ही टाळली तर दूरस्थ शिक्षण परिणामकारक ठरेल.

**2.वाचन व पठन साहित्यनिर्मिती :**

दूरस्थ शिक्षणात वाचन व पठन साहित्याचे महत्त्व आहे.कारण अध्ययन केंद्र ,अध्यापक ,विद्यार्थी यांचा प्रत्यक्ष संपर्क नसल्यामुळे ज्ञान संक्रमणाचे कार्य केवळ या साहित्याच्या माध्यमाने होते.हे साहित्य विशिष्ट पद्धतीने संरचित केलेले असते.ज्यामुळे अध्ययनास प्रवृत्त करणारी प्रेरक पुस्तके असतात.यामध्ये मानसशास्त्रातील प्रेरणातत्व उपयोगात आणून सर्व स्तरातील लोकांच्या दर्जाची पुस्तके निर्माण केली जातात.

**3.अध्ययन केंद्रे व त्यांचे संघटन :**

सर्वच अध्ययन केंद्रावर सदर शिक्षणपद्धती राबवताना उपलब्ध मनुष्यबळ मिळेल याची शक्यता कमी असते.आर्थिक खर्च केंद्रामार्फत योग्य प्रमाणात होईल की नाही याची शक्यता कमी असते.

**4.सुसंवाद व सुवाहन सुविधा :**

विभागीय केंद्रे व अध्ययन केंद्रे याच्यांत संपर्क साधण्याचे दोन मार्ग टपाल व दूरभाष केंद्रे सर्वच ठिकाणी या दोन साधनांमार्फत म्हणावा तसा संपर्क होत नाही.

**5.जनजागरण :**

भारतात ही शिक्षणपद्धती आहे. जे घरी आहेत वा व्यवसाय करतात.ज्यांचे शिक्षण बंद आहे अशा लोकांना माहिती करुन देणे.शाळांवरील शिक्षक जे नोकरीमुळे पुढील शिक्षण पूर्ण करु शकले नाहीत.त्यांना सुट्टीमध्ये शिक्षण दिले जाते. या सर्व गोष्टींचा समाजात प्रसार होणे आवश्यक आहे.

**दूरस्थ शिक्षणाची वैशिश्टये :**

1.शिक्षक आणि विद्यार्थी हे छापील साहित्याच्या दुव्याने जोडले जातात .
2.संपर्क माध्यमातून शिक्षक–विद्यार्थी,विद्यार्थी–विद्यार्थी,समुपदेशक–विद्यार्थी, आंतरक्रिया घडतात.
3.वैयक्तिकरित्या अध्ययन घडते.

4.लवचिक प्रक्रिया वेळ,स्थळ ,यांच्या बंधनापासून मुक्त आहे.
5.अध्ययनकर्ता स्वतःच्या गतीने शिकतो. व कमी खर्चात शिक्षण घेणे शक्य होते.
6.अनुभवी व तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेता येतो.
7.स्वंयअध्ययनाची प्रवृत्ती वाढीस लागते.
8.नोकरी वा व्यवसाय करुन शिक्षण पूर्ण करता येते.
9.कोणत्याही वयाच्या व्यक्तीला हे शिक्षण घेता येते.
10.औपचारिक शिक्षणाला जशा मर्यादा पडतात.तशा दूरस्थ शिक्षणाला पडत नाही.
11.विद्यार्थी हा केंद्रस्थानी असतो.विषय ,वेळ, अध्ययन पद्धती, अभ्यासकेंद्र सर्व निर्णय विद्यार्थी घेउ शकतो.प्राथमिक ते उच्च शिक्षणाच्या कोणत्याही स्तरावर ते घेता येते.
12.तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम ,शेतकरी ,व्यापारी ,महिला यांच्यासाठी विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. तसेच पदव्युत्तर व संशोधनविषयक अभ्यासक्रमांचा समावेशही दूरस्थ शिक्षणात झाला आहे.

थोडक्यात दूरस्थ शिक्षणाला मर्यादा नाहीत.

**दूरस्थ शिक्षणाचे फायदे :**

1.अभ्यासू व तज्ञ आणि कुशल शिक्षकांची उणीव भरुन काढता येईल.
2.प्रत्यक्ष शिक्षक जवळ नसले तरी त्यांचे मार्गदर्शन मात्र मिळू शकते.
3.दूरदर्शन ,आकाशवाणी ,चित्रफिती ,ध्वनीचित्रफिती, इंटरनेट ,पत्र, दूरध्वनी अशा विविध माध्यमांद्वारे शिकणा–यांच्या गरजा सहज भागवता येतात.
4.ठराविक साच्याच्या,वेळखाउ, खर्चीक, अध्यापनातून मुक्तता मिळवण्याच्या दृष्टीने अध्ययन अध्यापन अधिक माहितीपूर्ण अद्ययावत व मनोरंजक करण्याच्या दृष्टीने दूरस्थ शिक्षण उपयुक्त ठरते.
5.विद्यार्थी व्यवसाय करताना शिक्षण घेउ शकतो.जे त्याला त्याच्या व्यवसायात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष स्वरुपात फायदा देउ शकते.
6.ही प्रणाली अंत्यत लवचिक असल्याने व्यक्तीला आपल्या बदलत्या गरजा व अभिरुचीनुसार शिक्षण घेता येते.
7.अंत्यत दुर्गम असलेल्या भागांतील प्रज्ञावान विद्यार्थी या प्रणालीद्वारा शिक्षण घेउ शकतो.

दूरस्थ शिक्षण प्रणाली व शिक्षक शिक्षण या दोन्हींचा विचार केला तर सध्या शिक्षक शिक्षण पद्धतीत अनेक बदल झाले आहेत.त्याचप्रमाणे शिक्षणव्यवस्थेमध्ये अभ्यासक्रम ,अध्यापन पद्धती , शैक्षणिक साधनांचा वापर इ.गोष्टीमध्ये बदल झाले आहेत.शिक्षकांच्या गुणवत्ता वाढीसाठी उच्च शिक्षणाचे पर्याय ठेवले आहेत.त्याचबरोबर शिक्षणातील गुणवत्ता वाढली तर आर्थिक बाबीतही फरक पडू लागला आहे.याचा परिणाम शिक्षक शिक्षणावर झाला आहे.जे सेवांतर्गत शिक्षक आहेत ते गुणवत्ता वाढ , वेतनवाढ , पदोन्नती यासाठी शिक्षण घेउ इच्छितात.त्यांच्यासाठी दूरस्थ शिक्षण हा उत्तम पर्याय आहे.नोकरी करत असताना सुट्टी कालावधीमध्ये शिक्षण घेउ शकतात.किंवा पत्राद्वारेसुद्धा शिक्षणप्रणाली उपलब्ध आहे.

ग्रामीण भागात नोकरी करणारांना उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागते.परंतु दूरस्थ शिक्षणामुळे ग्रामीण भागातील शिक्षकही आता शिक्षण घेउ लागला आहे.शिक्षक शिक्षणामध्ये ठराविक कालमर्यादेत अभ्यासक्रम पूर्ण करुन त्याची परीक्षा देउन मूल्यमापन केले जाते.परंतु दूरस्थ शिक्षणात शिक्षक वा विद्यार्थी स्वतःच्या उपलब्ध वेळेनुसार प्रवेश घेउन शिक्षण घेउ शकतो.

शिक्षक शिक्षणामध्ये विविध अभ्यासक्रम विविध घटक यांचे शिक्षण दिले जाते.जे दूरस्थ शिक्षणादवारे समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला जातो. शिक्षक शिक्षणामध्ये

**संर्दभसूची**

*भोसले रमा, डोणे उज्ज्वला (जानेवारी 2009) शिक्षणातील बदलते विचारप्रवाह, फडके प्रकाशन कोल्हापूर.*

*नानकर प्र.ल., शिरोडे संगिता (एप्रिल2010) वर्तमान शिक्षणातील विचारप्रवाह,नित्यनूतन प्रकाशन, पुणे.*

*सांगोलकर अरुण (मे2010) नवीन जागतिक समाजातील शिक्षणाचे विचारप्रवाह,इनसाईट पब्लिकेशन्स ,नाशिक.*

*सप्रे निलिमा,पाटील प्रीती (डिसेंबर 2008)शिक्षणातील विचारप्रवाह,फडके प्रकाशन,कोल्हापूर.*